नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम, १९७६.

अधिनियमाच्या कलम २० खाली अंशत: अतिरिक्त जमिनींना सूट देण्याच्या प्रकरणात करावयाची कार्यपध्दती........

महाराष्ट्र शासन,
गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: युएलसी-१०८८/[२७९६]/का. १३,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २२ ऑगस्ट, १९८८.

वाचा :- [१] शा.नि.गृ.नि. व वि.स.वि.क्रमांक:युएलसी-१०८७/मंमंउस.११५/[२४५०]/का.१३, दिनांक १९ फेब्रुवारी, १९८७.
[२] शा.नि.गृ.नि. व वि.स.वि.क्रमांक:युएलसी.१०८७/मंमंउस.११५/[२४५०]/का.१३, दिनांक ८ जून, १९८७.

नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमाच्या कलम २० खाली बृहन्मुंबई नागरी समूहांत ३४० चौ.मी.पर्यंत आणि इतर नागरी समूहांत ३०० चौ.मी. पर्यंतच्या अतिरिक्त जमिनींना अंशत: अतिरिक्त जमिनी संबोधून सूट देण्याचे अधिकार मुंबई व पुणे नागरी समूहांत अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी आणि इतर नागरी समूहांत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान केलेले होते. वर नमूद केलेल्या शासन निर्णयात दिलेल्या तीन विकल्प, शिवाय शासनाने कलम २० खाली अंशत: अतिरिक्त जमिनींना सूट देण्याबाबत आणखी सवलती देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

शासन निर्णय:-

१] मुंबई नागरी समूहांत ३४० चौ.मी.पर्यंतच्या अंशत: अतिरिक्त जमिनी आणि इतर नागरी समूहांत ३०० चौ.मी.पर्यंतच्या अंशत: अतिरिक्त जमिनींचा वापर बागबगीचा, वृक्षारोपण यासाठी करावयाचा असल्यास कलम २० खाली प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सूट देण्यात यावी. मात्र सूटीच्या आदेशात अंशत: अतिरिक्त जमिनीचे चटईक्षेत्र वापरता येणार नाही अशी अट घालावी. सूटीच्या आदेशाची प्रत महानगरपालिका, नगरपालिका किंवा विकास प्राधिकारी यांना, कोणत्याही परिस्थितीत सूट दिलेल्या जमिनीचे चटईक्षेत्र वापरण्यास परवानगी देवू नये या आदेशासह, अग्रेषित करावी. सौंदर्याच्या वास्तवतावादी दृष्टीकोनातून अशी सूट देण्याची ... प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन कार्यपध्दतीत बसणारी म्हणून सूट द्यावी.

२] अतिरिक्त घोषित केलेल्या जमिनीपैकी जे भूखंड बृहन्मुंबई नागरी समूहांत ३४० चौ.मी.पर्यंत आणि इतर नागरी समूहांत ३०० चौ.मी.पर्यंत असतील आणि जमीनधारक एकच असेल तर अतिरिक्त जमीन कितीही असली तरी सदरहू भूखंड अंशतः अतिरिक्त जमिनी समजून त्याबाबत शासनाने प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन कलम २० खाली सूट देण्यात यावी.

ज्या प्रकरणांत अतिरिक्त घोषित केलेली जमीन अंशतः अतिरिक्त जमिनीं पेक्षां जास्त असेल अशी प्रकरणे सक्षम प्राधिकाऱ्यांनी अभिप्रायासह शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावी. अशा प्रकरणांत अतिरिक्त जमिनीची चालू बाजार भावाने होणारी किंमत आणि नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमानुसार देय असलेली किंमत यामधील फरक शासनाकडे भरण्याच्या अटीवर कलम २० खाली सूट देण्याची कार्यवाही शासन करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

अ लाल

[ अशोक लाल ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१. राज्यपालांचे सचिव,
२. मुख्य मंत्र्यांचे सचिव,
३. मंत्री [नागरी जमीन कमाल धारणा] यांचे खाजगी सचिव,
४. राज्यमंत्री [नागरी जमीन कमाल धारणा] यांचे खाजगी सचिव,
५. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
६. सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
७. मुख्य सचिव,
८. सर्व मंत्रालयीन विभाग,
९. विभागीय आयुक्त, कोंकण/पुणे/नाशिक/नागपूर विभाग,
१०. जिल्हाधिकारी, नाशिक/नागपूर/सांगली/xxxxxxx/ठाणे/कोल्हापूर/सोलापूर,
११. अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, [ना.ज.क.धा.], मुंबई/पुणे,
१२. उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, [ना.ज.क.धा.] नागपूर/नाशिक/सांगली/ उल्हासनगर/ठाणे/कोल्हापूर/सोलापूर,
१३. महानगरपालिका आयुक्त, मुंबई/पुणे/नागपूर/सोलापूर/नाशिक/ठाणे/पिंपरी-चिंच कल्याण/ कोल्हापूर,
१४. मुख्य अधिकारी, नगरपरिषद, सांगली/उल्हासनगर/वसई/उरण/मिरा-भाईंदर,
१५. गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागातील सर्व अधिकारी/कार्यासने,
१६. निवड नस्ती/का.१३, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंब

Scanned with CamScanner